SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 6 8 4      दि. 18 OCT 2025

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,/मान्यता प्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' च्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित समारंभांमध्ये विद्यापीठांचा आणि संलग्नित महाविद्यालयांच्या सहभागाबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे संदर्भ क्र. अशिसं/वंदे मातरम गीत/परिपत्रक/ मवि-१/२०२५/ई.२३०५२९३, दि. १०/१०/२०२५ रोजीचे पत्र.
२) मा. मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्र. मंत्री को. उद्यो. रोज. नावि. टिपणी/८७३/२०२५, दि. २५/०८/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते कि, मा.मंत्री. श्री मंगलप्रभात लोढा यांनी मा.राज्यपाल महोदय यांना लिहिलेल्या दि.२५/०८/२०२५ रोजीच्या पत्रानुसार राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' च्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विद्यापीठ व सर्व संलग्नित महाविद्यालयांनी सहभागी होण्याबाबत कळविले आहे.

तसेच दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण (Sesquicentenary) होत आहेत. या महत्वपूर्ण घटनेचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत विविध कार्यक्रमांव्दारे गौरवपूर्ण सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

तेंव्हा सदर कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीनी सहभागी होणेबाबत कळविले आहे. सोबत संदर्भिय पत्राची प्रत्र जोडली आहे.

कळावे.

आपला विश्वासू
(signature)
उपकुलसचिव

सोबत :- वरील संदर्भीय पत्रे

E:\Nil\Parit Sir\Circular 2025.docx

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web :** www.dhepune.gov.in **E-Mail :** mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२१११

क्र.: उशिसं/वंदे मातरम गीत/परिपत्रक /मवि-१/२०२५/ई. २३०५२९३ दि. १०/१०/२०२५

**परिपत्रक**

**विषय:- राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' च्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित समारंभांमध्ये विद्यापीठांचा आणि संलग्नित महाविद्यालयांचा सहभागाबाबत.**

वाचा:- मा. मंत्री कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्य यांनी मा. राज्यपाल महोदय यांना लिहिलेले पत्र दि.२५.८.२०२५

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी मा. राज्यपाल महोदय यांना लिहिलेले दि.२५.८.२०२५ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय, गीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण (Sesquicentenary) होत आहेत. या महत्त्वपूर्ण घटनेचे औचित्य साधून कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत विविध कार्यक्रमांद्वारे गौरवपूर्ण सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

या सोहळयानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा तपशील उपरोक्त पत्रात नमूद केलेला आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमात आपल्या विद्यापीठातील तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी व्हावेत यासाठी आपल्या स्तरावरुन पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 10-10-2025 18:39:24

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.

शिक्षण संचालनालय,
(... शिक्षण)
महार ... ४११०१६
- 9 OCT 2025
आव
प्र

GOVERNOR'S SECRETARIAT
RAJ BHAVAN
MALABAR HILL
MUMBAI 400 035
No.RB/Edn.1/Gen-2025/748.

3rd September 2025

To,

All Vice Chancellors of State Universities.

Subject : Regarding participation of the universities and affiliated colleges in celebration festivities of Vande Mataram completion of sesquicentenary i.e. the one-hundred-and-fiftieth year of composition of 'National Song'.

Respected Sir/Madam,

Please find enclosed herewith a copy of the letter dated 25.08.2025, addressed to the Hon'ble Governor from Shri Mangalprabhat Lodha, Hon'ble Minister of Skills, Employment, Enterprineurship and Innovation and on the subject mentioned above. The letter mentions that, the 7th November 2025, marks completion of sesquicentenary i.e. the one-hundred-and-fiftieth year of compostion of the National Song 'Vande Matram'. The event will be celebrated by the Skill, Employment Enterprineurship and Innovation Department though various programmes. The details of celebrations activities which are being undertaken have also mentioned in the letter.

In view of the above, I am directed to request you to ask the students of your university and affiliated colleges to have participation in each and every programmes arranged through the Skill, Employment, Enterprineurship and Innovation Department, in regard to the said occasion.

With regards.

Yours sincerely,

03.09.2025

(Vikas Kulkarni)
I/c.Under Secretary to the Governor (Edn)

मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व
नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक : 2 ?.6 2025

- लोगो डिझाइन स्पर्धा
- गीतगायन स्पर्धा
- तसेच अन्य सांस्कृतिक उपक्रम

राज्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये हे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीस वंदे मातरम, त्याचा इतिहास, त्याचे महत्व या बाबत योग्य माहिती मिळू शकते. या कार्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), महाराष्ट्र छात्र सेना (MCC), शिक्षणक्षेत्रातील विविध स्वयंसेवी संस्था तसेच शिक्षण संस्था चालक यांचा सक्रिय सहभाग घेतल्यास हा कार्यक्रम अधिक प्रभावी होऊ शकतो. वरील उपक्रमांच्या आयोजनासाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये एक प्राध्यापक-समन्वयक नेमल्यास या कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी अधिक चांगल्या प्रकारे होणार आहे.

राज्यातील सर्व विद्यापीठ यांनी वरील प्रमाणे निर्देश त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना दिल्यास हा कार्यक्रम व्यापक स्वरुपात साजरा होऊ शकतो. आपण राज्य विद्यापीठांचे कुलपती या नात्याने शैक्षणिक क्षेत्रात सर्वोच्च स्थान भूषवत आहात व राज्यात आपल्या मार्गदर्शनाखाली जर सर्व विद्यापीठे व त्यांच्या संलग्न महाविद्यालये अतिशय जोमाने कार्यरत आहेत. आपल्या कार्यालयाद्वारे सर्व विद्यापीठांना "वंदे मातरम सार्धशताब्दी महोत्सव" राज्यातील सर्व महाविद्यालयात साजरा करणे बाबत निर्देश देण्यात आले तर हा महोत्सव विद्यार्थ्यांमध्ये व्यापक देशभक्तीची भावना निर्माण करण्यास आणि सांस्कृतिक अभिमान दृढ करण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

तरी वरील प्रमाणे निर्देश देऊन आम्हास उपकृत करण्यात यावे हि नम्र विनंती.

आपला,

(श्री. मंगलप्रभात लोढा)

प्रति,
मा. राज्यपाल महोदय,
राजभवन, मुंबई

जा.क्र.मंत्री को उद्यो.रोज.,नावि./टिपणी/ १२० दि.
873/2025

NIC Receipt
29/08/2025
No. 8931547

मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in
दिनांक : 25 AUG 2025

माननीय महामहिम राज्यपाल महो. म.

विषय : "वंदे मातरम्" सार्धशताब्दी महोत्सव-विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांचा सहभागाबाबत विनंती.

नमस्कार

वंदे मातरम्,

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात "वंदे मातरम्" या राष्ट्रीय गीताला अद्वितीय स्थान प्राप्त झाले आहे. हे गीत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आपल्या *"आनंदमठ"* या कादंबरीत रचले. मातृभूमीचे देवीस्वरूपातील वर्णन करणारे हे गीत देशभक्ती, स्वाभिमान व बलिदानाची भावना जागृत करणारे ठरले.

"वंदे मातरम्" या घोषणेने असंख्य क्रांतिकारकांना ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. आंदोलने, सभा व मोर्चात हे गीत उच्चारले गेले आणि राष्ट्रीय चळवळीचे प्रतीक बनले. १९५० मध्ये संविधान स्वीकृतीवेळी *"जन गण मन"* हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले गेले आणि *"वंदे मातरम्"* या गीताला अधिकृतरित्या राष्ट्रीय गीत (National Song) म्हणून मान्यता देण्यात आली.

दिनांक ७ नोव्हेंबर,२०२५ रोजी "वंदे मातरम्" या गीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधून राज्यभर "वंदे मातरम् सार्धशताब्दी महोत्सव" कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात येणार आहे.

या महोत्सवांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची प्रेरणा, इतिहासाची जाणीव व सांस्कृतिक अभिमान वृद्धिंगत करण्यासाठी खालील स्पर्धा व उपक्रम आयोजित करण्याचे नियोजन आहे :

Convey to Vice Chancellors

- निबंध लेखन स्पर्धा
- वक्तृत्व स्पर्धा
- वादविवाद स्पर्धा
- पोस्टर सादरीकरण
- चित्रकला स्पर्धा
- लघुपट / रील निर्मिती

DS(EDU) As directed 28/8/2025

कार्यालय पत्ता : दालन क्र. २०२, २ रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. : ०२२ २२०० २५३०८/२२०२ ४५९३, ई-मेल : min.skills@maharashtra.gov.in